दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २४८ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.५ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## डिझेल चोरी करणारे पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील साईकृपा हॉटेलच्या पुढे टायर पंचर दुकानाच्या बाजूस २ ट्रेलर उभे असताना आरोपी शाहिद आफ्रिदी नूर मोहम्मद शेख(२४ रा. गोवंडी), मोहम्मद हसनैन दिलशाद शेख (वय २० रा. गोवंडी) व तिसरा सहकारी टकल्या (पूर्ण नाव माहित नाही) यांनी आपसात संगनमत करून या २ ट्रेलर मधील जवळपास ५५० लिटर डिझेल चोरून ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार दिलीप जोखू कुमार यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात देताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, पोलीस हवालदार परेश म्हात्रे, गंथडे, वायकर, दिवेकर, पोलीस नाईक विनोद देशमुख, सम्राट डाकी आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तुर्भे पोलिसांच्या आधारे शाहिद आफ्रिदी नूर मोहम्मद शेख(२४ रा. गोवंडी), मोहम्मद हसनैन दिलशाद शेख (वय २० रा. गोवंडी) या दोघांना तुर्भे परिसरातून ताब्यात घेतले असून त्यांच्या कडून चोरीचे २७० लिटर डिझेल हस्तगत केले आहेत. तर फरार आरोपी टकल्या याचा शोध पोलीस हवालदार परेश म्हात्रे करीत आहेत.

### १५०० कोटींचा चुराडा....

# रायगडमध्ये 'जलजीवन'चा प्रवास टँकरकडून पुन्हा टँकरकडे!

**कंत्राटदारांनी टँकरचे पैसे भरण्याचा फतवा**

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'जल जीवन मिशन' योजनेचा रायगड जिल्ह्यात बोजवारा उडाला असून, आता त्याचे खापर कंत्राटदारांवर फोडण्याचा प्रकार सुरू झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने चक्क कंत्राटदारांनाच अपूर्ण योजनांमुळे टँकर लागत असतील तर त्याचे पैसे तुम्ही भरा, अशा नोटीसा बजावल्या आहेत. या बाबत संजय सावंत यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, हा निर्णय म्हणजे योजनेच्या अपयशाची कबुली असल्याची टीका त्यांनी केली आहे.



रायगड जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी 'हर घर जल' या घोषणेसह १,४२२ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. यासाठी तब्बल दीड हजार कोटींचा निधी वर्ग करण्यात आला. मात्र, २०२४ अखेरपर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित असताना, रायगड जिल्ह्यातील ६० टक्के योजना आजही अपूर्णावस्थेत आहेत. आता कामे रखडल्याने टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. या टँकरचा खर्च आता संबंधित कंत्राटदारांकडून वसूल करण्याच्या, तसेच त्यांना विलंब शुल्क आकारण्याच्या नोटीसा विभागाने काढल्या आहेत.

काही कंत्राटदारांनी जुन्याच टाक्यांना आणि योजनांना रंगरंगोटी करून नव्याने बिले मागितली आहेत. काही ठिकाणी तर पाणी उपलब्ध नसतानाही जास्त क्षमतेच्या योजना मंजूर करून घेतल्या गेल्या आहेत.

२०२४ च्या अखेरीस प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी देण्याचे उद्दिष्ट होते, पण डिसेंबर २०२५ महिना उजाडला तरी अनेक गावांत पाण्याचा थेंबही नाही. जिथे टंचाई, तिथेच कामे अपूर्ण: कर्जत आणि पेण यांसारख्या तालुक्यांत जिथे डिसेंबरमध्येच पाणीटंचाई सुरू होते, तिथेच योजनांची कामे सर्वाधिक रखडलेली आहेत. ९६ टक्के काम झाल्याचा दावा केला जात असला तरी वस्तुस्थिती वेगळी आहे.

कंत्राटदारांची सुमारे ९५ कोटींची बिले थकली आहेत, मात्र शासनाकडून केवळ २० कोटी प्राप्त झाले आहेत. ज्यांचे राजकीय वजन आहे, त्यांची बिले निघाली, बाकीचे मात्र अडकले आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी स्पष्ट केले आहे की, कंत्राटदारांकडून जितके दिवस काम उशीर होईल, त्या स्वरूपात दंड आकारला जाईल. कोणत्याही परिस्थितीत योजना पूर्ण कराव्या लागतील. एकंदरच, दीड हजार कोटी रुपये खर्चूनही रायगडकरांची तहान भागलेली नाही. उलट आता प्रशासन आणि कंत्राटदार यांच्यातील या वादात सर्वसामान्य नागरिकांना मात्र पुन्हा टँकरच्याच भरवशावर राहावे लागणार, हे स्पष्ट झाले आहे.

> जल जीवन योजना सुरू झाल्यापासून यातील नियोजनाचा अभाव आणि भ्रष्टाचाराबाबत सातत्याने पत्रव्यवहार करत आहे. चुकीचे नियोजन, अस्तित्वात नसलेल्या जलस्रोतांवर योजना मंजूर करणे आणि जुन्याच योजनांची रंगरंगोटी करून बिले उकळण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. आता हजारो कोटी खर्च होऊनही जर प्रशासनाला कंत्राटदारांकडून टँकरचे पैसे मागण्याची वेळ येत असेल, तर हा प्रकार अतिशय हास्यास्पद आहे. हे केंद्र शासनाच्या जलजीवन योजनेचे पूर्ण अपयश असून, प्रशासनाने जनतेची दिशाभूल थांबवावी.
>
> **संजय सावंत**
> **सामाजिक कार्यकर्ते**

## गहाळ झालेले ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना केले परत

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल ।** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा, कक्ष २ यांनी गहाळ झालेले ८,९२,५७४/- किंमतीचे ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना परत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत असणाऱ्या पोलीस ठाणेकडे विविध इसमांकडून मोबाईल गहाळ झालेबाबतच्या तक्रारी नोंद करण्यात येतात. सदर तक्रारी नोंद करण्यात आल्यानंतर पोलीस ठाणेकडून गहाळ झालेल्या मोबाईलची माहिती उएखठ या शासकीय पोर्टलवर भरण्यात येते. सदर पोर्टलवर गहाळ झालेल्या मोबाईल फोनची माहिती गुन्हेशाखा प्राप्त करते.

गहाळ मोबाईल उएखठ या शासकीय पोर्टलचे सहाय्याने व तांत्रिक तपास करुन गहाळ मोबाईलमध्ये नवीन मोबाईल नंबर निष्पन्न झाल्यानंतर महाराष्ट्र तसेच विविध राज्यातील इसमांना सदर मोबाईल नंबरवर संपर्क करुन मोबाईल धारकास मोबाईलचे वस्तुस्थितीबाबतची माहिती देवुन त्यांचेकडुन सदरचे मोबाईल फोन प्राप्त केले जातात. त्यानुसार सप्टेंबर २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गहाळ झालेले ८,९२,५७४/- किंमतीचे ५३ मोबाईल फोन कक्ष २, गुन्हे शाखेकडून प्राप्त केले. सदरचे ५३ मोबाईल फोन मुळ मालकांना परत देण्यात आले आहेत.



गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळाल्याने मोबाईल मालकांनी त्याबाबत आनंद व्यक्त करुन नवी मुंबई पोलीसांचे कौतुक केले. तसेच भविष्यात ही पोलीसांनी अशीच चांगली कामगिरी करावी असे मत व्यक्त केले. सदरची उल्लेखनीय कामगिरी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ, सहा. पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली व वपोनि अनिल पाटील, कक्ष २, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे देखरेखीखाली मपोहवा सुनिता चंदगीर, पोशि संतोष तांदळे, मपोशि स्नेहा गायकवाड यांनी केली आहे.

## उच्च न्यायालयाच्या मतमोजणी निकालाला 'सर्वोच्च' आव्हान; ५ डिसेंबरला सुनावणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया सुरू असतानाच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाने मतमोजणी लांबणीवर पडली. मतमोजणी प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका आता सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे उद्या, ५ डिसेंबरला सुनावणी होणार आहे. या याचिकेच्या सुनावणीसह सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहील.

राज्यातील सर्व २८८ नगरपालिका व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २ डिसेंबरला दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर रोजी मतदान संपल्याच्या पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. राज्यातील २६४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. या ठिकाणी ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती. मात्र, सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपालिका व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपालिका व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी २१ डिसेंबर रोजी मतमोजणी करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, या आदेशाला आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका ४ डिसेंबरला स्वीकारली.

## माणगाव नगरपंचायत उपनगराध्यक्षपदी रिया उभारे यांची बिनविरोध निवड



**दै.रायगड नगरी । संतोष सुतार**

**माणगाव ।** रायगड जिल्ह्यात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या माणगाव नगरपंचायतवर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा वर्चस्व सिद्ध केले आहे. यापूर्वीच्या उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर (काळे) यांनी उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर ४ डिसेंबर रोजी माणगाव नगरपंचायत दालनात उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक घेण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका रिया रत्नाकर उभारे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने रिया रत्नाकर उभारे यांची माणगाव नगरपंचायत उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीच्या कार्यभारात पिठासीन अधिकारी माणगाव उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) डॉ.संदीपान सानप यांच्यासह नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी यांनी काम पाहिले.

माणगाव नगरपंचायतमध्ये अनेक राजकीय स्थित्यंतरे घडल्यानंतर आजच्या मितिला नगरपंचायत मध्ये जनतेने निवडून दिलेले नगरसेवक एकूण १७ त्यापैकी १ शिवसेना शिंदे गट,१ उभाठा तर उर्वरित १५ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) आहेत तर, नामनिर्देशित (स्वीकृत)२ नगरसेवक हे देखील राष्ट्रवादी (अप) चे आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे महाराष्ट्र राज्य प्रांत अध्यक्ष तथा रायगड रत्नागिरीचे खासदार सुनिल तटकरे यांनी अनेक राजकीय उलथापालथी नंतर माणगाव नगरपंचायत वर आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. ४ डिसेंबर रोजी माणगाव नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षपदी रिया रत्नाकर उभारे यांची बिनविरोध नियुक्ती झाल्यानंतर राष्ट्रवादी नगरसेवक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी यांनी नगरपंचायत प्रांगणात फटाक्यांची आतषबाजी व जल्लोष केला. नगरपंचायतचे मुख्याधिकारी संतोष माळी व सर्व नगरसेवक यांनी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष यांचे अभिनंदन केले.

## चिरनेर, पाणदिवे व उरण शहरात मोठ्या उत्साहात श्री दत्त जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

विद्युतरोषणाई, फुलांची आकर्षक सजावट आणि धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांनी गुरुवारी (दि. ४ डिसेंबर) चिरनेर, पाणदिवे, उरण, न्हावा शेवा पोलीस ठाणे व उरण शहरातील मंदिरांमध्ये श्री दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सायंकाळी मंदिरांमध्ये प्रथेप्रमाणे श्री दत्त जन्म सोहळा साजरा करण्यात आला.यावेळी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती, श्री दत्त गुरूंच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. यानिमित्ताने भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.



दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्त मंदिरांमध्ये वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभिषेक, महापूजा, आरती, दत्तयाग यांसह भजन-कीर्तन, प्रवचन, व्याख्याने, पालखी सोहळा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षी मार्गशीर्ष महिन्यात श्री दत्त जयंती सोहळा गुरुवारी आल्याने विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. चिरनेर कातळपाडा येथील श्री दत्त मंदिरात श्री दत्त जन्मसोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमात कीर्तनकार नरेंद्र महाराज यांनी श्री दत्तजन्म कीर्तन आख्यान, प्रवचन सुरेख संगम घडवून आणल्याने भक्त गण दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या सुरात सूर मिसळून तल्लीन झाले होते. हजारो भक्तांनी आप आपल्या कुटुंबसह श्री दत्त मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले.यावेळी मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

## आंबेवाडी येथील छत्रपती शिवाजी नगर येथे बंद घरात घरफोडी

**चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास ; पाले बु.येथून टुव्हीलर गाडी चोरीला**

**दै.रायगड नगरी । विश्वास निकम**

**कोलाड ।** रोहा तालुक्यातील आंबेवाडी येथील छत्रपती शिवाजी नगर येथे मंगळवार दि.२ डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बंद घरांचा फायदा घेत घरफोडी करून दागिने व रोख रक्कम लंपास केली असुन पाले बु. येथील पांडुरंग महाबळे यांच्या ताब्यातील टुव्हीलर गाडी चोरीला गेल्याची घटना घडली असुन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या थंडीचा जोर वाढला असुन थंडीमुळे रात्री अपरात्री नागरिक कोण घराबाहेर पडत नसल्यमुळे याचा फायदा चोरटे घेत असुन बंद घरातून चोरी करण्याचे प्रकार वाढले असल्याचे दिसून येत आहेत. मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास आंबेवाडी येथील छत्रपती शिवाजी नगर येथील सुरेश गजानन कदम यांचे घर लोखंडे साधनाने दरवाजा कोयंडा तोडून ४३०० रुपयांचे चांदीचे दागिने व मनगटी घड्याळ,तसेच १०००० रुपये रोख रक्कम असे एकूण १४३०० रुपयांचा माल लंपास केला आहे.तसेच याशिवाय पाले बु. येथील पांडुरंग महाबळे यांची घरासमोर लावण्यात आलेले टुव्हीलर गाडी चोरला गेली आहे. याचा अधिक तपास कोलाड ठाण्याचे सहा.पोलिस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.फौजदार नागे करीत आहेत



# ही राडेबाजी कोणामुळे?

लोकसभा, विधानसभेलाही जे घडत नाही ते कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत मंगळवारी बघायला मिळाले. बोगस मतदानाचे प्रकार घडले, नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराच्या भावाच्या फार्महाउसवर नोटांची बंडले, दारूच्या बाटल्या, बोटावरील शाई पुसण्यासाठीचे द्रव आढळले. गेवराईत तुफान हाणामारी झाली. कुठे गाड्यांची तोडफोड झाली, तर कुठे मारहाणीचे प्रसंग. आमदारच मतदान केंद्रावर जाऊन 'मत कसे द्यायचे' ते मतदाराला सांगत असल्याचा प्रकारही घडला. 'मेरा गाव, मेरा देश' अशा पद्धतीने स्थानिक मुद्दे, सामाजिक समीकरणे यावर प्रामुख्याने ही निवडणूक झाली. त्यामुळे गावागावांतील कटुतेचे संदर्भही वेगळे होते. निवडणुकीत राडे करण्याबाबत नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांच्या निवडणुकीने एक पाऊल पुढे टाकले. अर्थात अनेक ठिकाणी सूत्रधार हे नेतेच होते. त्यांचा आश्रय असल्याशिवाय कार्यकर्ते हिंमतही करीत नाहीत. आपल्या राजकीय वर्चस्वासाठी एकमेकांना भिडवून देणारे नेते निवडणूक आटोपली की नामानिराळे होतात; पण, निवडणुकीदरम्यान आलेल्या कटुतेचे पडसाद दीर्घकाळ समाजात उमटत राहतात याचे भान कोण बाळगणार? लोकशाही प्रक्रियेतून होणाऱ्या निवडणुकीला काळिमा फासणारे लोक उद्या नगरपरिषदांमध्ये निवडून आले तर पाच वर्षांच्या त्यांच्या कारभारातही दादागिरी, खाबूगिरीचे प्रदर्शन होत राहील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मतदानादरम्यान जे धुमशान जागोजागी बघायला मिळाले त्यात सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते सामील होते. सात-आठ वर्षांपासून न झालेली निवडणूक आली आणि राजकीय इच्छा-आकांक्षा उचंबळून आल्या. नगरपरिषदांच्या माध्यमातून होणारी विकासकामे, त्यातील टक्केवारी यामुळे आता नगरपरिषदांना कधी नव्हे एवढे महत्त्व आले आहे. महत्त्वाकांक्षेची जागा राक्षसी महत्त्वाकांक्षेने घेतली असून, त्यातूनच हिडीस प्रसंग घडत आहेत. पैशांतून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा हे आता खालपर्यंत झिरपले असून, त्याला अटकाव करणे कठीण झाले आहे. असे प्रकार रोखण्याची जबाबदारी नेमकी कोणाची हेही निश्चित झाले पाहिजे. या संपूर्ण निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगावर टीकेची सर्वपक्षीय झोड उठली. आयोगाने अनेक घोळ घातले. निवडणूक शांततामय वातावरणात व्हावी यासाठीची सर्वांत मोठी जबाबदारी अर्थातच आयोगाची होती. निवडणुकीच्या काळात संबंधित सर्व यंत्रणा या आयोगाच्या कक्षेत येतात आणि त्यांनी दिलेल्या आदेशांचे पालन हे या यंत्रणांना करावेच लागते. निवडणूक म्हटली की प्रत्येक ठिकाणच्या राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्था राखावी लागते. राजकीयदृष्ट्या संवेदनशील, अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, नगरपरिषदा कोणत्या याचे सूक्ष्म नियोजन करणे अपेक्षित असते. ते गृहविभागाच्या मदतीने आयोगाने करून ठेवलेले होते का? आणि करून ठेवलेले होतेच तर मतदानादरम्यान जे घडले ते रोखता का आले नाही, हा प्रश्न आहे. राज्याच्या गुप्तचर यंत्रणेने वेळोवेळी पोलिस दल आणि आयोगाला संभाव्य संवेदनशील केंद्रांबाबत माहिती दिली होती का? दिली असेल तर ती कितपत गांभीर्याने घेऊन खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या हेही समोर आले पाहिजे. आयोगाचे आयुक्त किंवा सचिव हे निवृत्त आयएएस अधिकारी असतात. एका अर्थाने हा आयोग म्हणजे रिटायर्ड क्लबच. गृहविभागापासून ज्या यंत्रणांची मदत आयोगाला निवडणुकीसाठी घ्यावी लागते तेथील विभागप्रमुख हे विद्यमान आयएएस, आयपीएस अधिकारी असतात. त्यामुळे ते आयोगाला फार मोजत नाहीत, असे तर नाही? केंद्रीय निवडणूक आयोगाचा आदेश जेवढ्या गांभीर्याने घेतला जातो तेवढे गांभीर्य राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांबाबत नसते. निवडणुका भयमुक्त वातावरणात घेण्यासाठी जबाबदार असलेल्या सर्व यंत्रणांमध्ये परस्पर समन्वय नव्हता, हे उघड होते. जिल्हा परिषद आणि महापालिकांच्या निवडणुका अद्याप बाकी आहेत. नगरपरिषदांचा टप्पा दोनही बाकी आहे. पहिल्या मोठ्या टप्प्यात जे काही विपरीत घडले त्याची पुनरावृत्ती तरी नको.. राडा संस्कृतीने महाराष्ट्राची अप्रतिष्ठा झाली आहेच; ती आणखी होऊ नये एवढेच. 'नगरपरिषदांच्या निवडणुकीत आयोगाने घातलेल्या गोंधळाची पुनरावृत्ती नंतरच्या निवडणुकांत होऊ देऊ नका,' अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहेच. मारपीट, पैसेवाटप, दारूचा महापूर, प्रलोभनांचे पीक, शिवराळ भाषेचा वापर या प्रकारांचीही पुनरावृत्ती होणार नाही याची हमी सर्वच राजकीय पक्षांनी दिली तर महाराष्ट्राच्या प्रतिमेला आणखी तडे जाणार नाहीत एवढेच!

# कृषी आधारित उपजीविका प्रकल्पामुळे ग्रामीण उत्पन्नात वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत, ईशान्य फाउंडेशनच्या माध्यमातून २०१३ पासून राबवत असलेल्या कृषी आधारित उपजीविका (वाडी) प्रकल्पामुळे पनवेल तालुक्यातील २८ गावे आणि ११ पाड्यांतील लहान, अल्पभूधारक आणिआदिवासी शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन होत आहे.



पडीक जमिनीला फळबाग आणि भाजीपाला उत्पादनक्षम शेतात रूपांतरित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वाडी मॉडेलमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास, हंगामी स्थलांतर कमी होण्यास आणि हवामानाशी जुळवून घेणारी शेती करण्यास मदत होते.

पडीक जमिनीपासून समृद्धीकडे या उपक्रमांतर्गत प्रत्येक पात्र शेतकऱ्याकडे अर्धा एकर क्षेत्रावर आंबा फळ बाग लागवडीबरोबर, कुंपणासाठी वनीकरणानाची झाडे, भाजीपाला लागवडीसाठी मदत व प्रोहत्सान दिले जात आहे. तसेच शेतकऱ्यांना मृद व जलसंधारणाचे प्रशिक्षण, ठिबक सिंचन, आणि चांगल्या दर्जाचे बियाणे व खत यासाठी मदत दिली जाते आहे. जमिनीचे वेगाने होणारे तुकडीकरण आणि अधिक उत्पादनाची गरज लक्षात घेऊन, दीपक फर्टिलायझर्सने उच्च घनतेची लागवड पद्धत पद्धतीने सुरू केली आहे.

या पद्धतीत फक्त ५गुंठ्यात ५० केशर जातीची आंब्याची रोपे लावली जातात. त्यामुळे जागेचा जास्त उपयोग होतो, फळधारणा लवकर सुरू होते, कीड रोगनियंत्रण सोपे होते आणि उत्पादनात मोठी वाढ होते.

आतापर्यंतचे प्रकल्पातील महत्त्वपूर्ण यश म्हणजे ४३० शेतकऱ्यांकडे आंबाफळ बाग विकसित; तसेच भाजीपाला लागवड सुरू, ८४.६% वाड्यांमध्ये फळधारणा, ३८० वाड्यांमध्ये फळधारणा झाली असून २०२४-२५मध्ये ३८,८३९किलोआंबा उत्पादनातून ३४.५६लाख रुपये उत्पन्न, ५५०शेतकऱ्यांना भाजीपाला लागवडीसाठी सहाय्य; सरासरी वार्षिकउत्पन्न ७५,८३३ पर्यंतवाढ, ७७३.२५एकर क्षेत्रावर शाश्वत शेती सुरू झाली असून ७३% कुटुंबांचे हंगामी स्थलांतर कमी झाले किंवा थांबवले आहे.

दीपक फर्टिलायझर्सच्या कसर उपक्रमांतर्गत आम्ही शाश्वत शेतीला ग्रामीण सक्षमीकरणाचा मजबूत पाया मानतो. वाडी उपक्रमाने तंत्रज्ञानाधारित शेती, सततचे मार्गदर्शन आणि हाय-डेन्सिटी प्लांटेशनसारख्या आधुनिक फळबाग लागवड पद्धतींच्या माध्यमातून जमिनीपासून कुटुंबांपर्यंत बदल घडवता येतो, हे प्रभावीपणे दाखवून दिले आहे. ईशान्य फाउंडेशनचे आदिवासी भागात शाश्वत प्रगतीचा पाया रचत आहे, हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवत आहे आणि शेतकरी कुटुंबांना सन्मान व आत्मविश्वास देत आहे.

**– नरेश पिनिसिटी, अध्यक्ष – कॉर्पोरेट गव्हर्नन्स, दीपक फर्टिलायझर्स**

# हरवंडी ८५% टक्के शॉर्ट सर्किटमुळे घराचे नुकसान

## घरमालकास मंत्री भरत शेठ गोगावले यांची तात्काळ ५० हजाराची मदत

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव ।** माणगाव निजामपूर विभाग, हरवंडी गावच्या श्री. परशुराम मानकर यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे आग लागले, ज्यामुळे दुर्दैवाने घराचे एकूण ८५ % नुकसान झाले. ही घटना कळताच तात्काळ हरवंडी येथे धाव घेतली आणि मानकर कुटुंबाला धीर दिला त्यांचे वस्त्र, धान्य, फर्निचर आणि इतर जीवनावश्यक साहित्य यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

या वेळी सर्वतोपरी मदतीचा हात देण्याचे सांगितले. सदर कुटुंबाला तात्काळ ५० हजाराची रोख मदत देण्यात आली. एका भग्न झालेल्या कुटुंबात नवसंजीवनी फुंकण्याचा प्रयत्न आहे. शिवसेना सदैव जनतेच्या सुख-दुःखात सहभागी राहिली आहे, आणि आजही तोच संकल्प कायम आहे. संकटाच्या प्रत्येक क्षणी सामान्य माणसाच्या सोबत राहण्याचा. श्री. मानकर आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब लवकरच पुन्हा नव्या उत्साहाने उभं राहील, हीच अपेक्षा यावेळी उपस्थित उपतालुकाप्रमुख मनोज सावंत युवा सेनेचे अविनाश नलावडे तसेच अच्युत तोंडलेकर संजय शिंदे गजानन मोहिते, प्रसाद जाधव इत्यादी उपस्थित होते.



# मन आणि मेंदू तसेच इच्छाशक्ती असेल तर दिव्यांग व्यक्ती यशस्वी होते : तहसीलदार स्वाती पाटील

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा ।** जागतिक दिव्यांग दिन ३डिसेंबर रोजी संपूर्ण देशात साजरा केला जातो.पंचायतसमिती तळा तर्फे तालुका स्तरीय दिव्यांग दिनाचेआयोजन कै. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात सकाळी ११वा. करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.तहसीलदार स्वाती पाटील होत्या. यावेळी गटविकास अधिकारी महादेव शिंदे,नायब तहसीलदार मंगेश पालांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ससाणे, तालुका कृषी अधिकारी हनुमंत कांबळे, दिव्यांग संघटना अध्यक्ष किशोर पितळे, कार्याध्यक्ष कुष्णा भोसले ग्रामविस्तार अधिकारी पुष्पा नेरकर, महीला बालविकास प्रकल्प अधिकारी दिपाली शेळके विचार मंचकावर उपस्थित होते.यावेळी जागतीक दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन करताना म्हणाल्या कि दिव्यांगाचे मनोबल वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात त्यामध्ये शारीरीक उपकरणे, पेन्शन योजना आरोग्य शिबिरे तपासणी, यु डी आय डी कार्डतसेच समाज कल्याण विभागातर्फे ५%निधी,पंचायत समिती ५%निधी वाटप केले जाते. दिव्यांगाना आलेले अपंगत्व जन्मताच असते किंवा अपघातामुळे येत असते हे दुर्दैव आहे. पण त्यावर मात केली पाहिजे. आज विविध क्षेत्रात दिव्यांग व्यक्ती सेवेत आहेत उद्धीष्ठ समोर ठेवून शासकीय स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन कलेक्टर, तहसीलदार, उच्च पदस्त अधिकारी कंपनीत अधिकारी शैक्षणिक संस्थेत शिक्षण विभागात आहेत यांनी मिळवलले यश मन आणि मेंदू तसेच इच्छा शक्ती असेल तर दिव्यांग व्यक्ती यशस्वी होते. हे दाखवून दिले आहे. मनातील न्युनगंड काढून टाका. ईच्छा शक्ती मजबूत ठेवा यश सहज शक्य होते असे मौलिक मार्गदर्शन केले व संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनायाची माहिती दिली. UDID कार्ड आवश्यक आहे. ते नसलेतर शासकीय लाभ मिळणार नाही १५००/-ची पेन्शन २५००/- झाली आहे. ऑनलाईन प्रमाणपत्र टेम्परारी असेल तर रिनिव्हल करून घ्या. सर्व तालुकास्तरीय स्पोर्ट साठी पॅरा मेडिकल दर ४ वर्षांनी होते.अशी माहिती दिली. गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी जागतिक दिव्यांग दिन ग्रामपंचायत स्तरावर साजरा केला जातो. परंतू यावेळी पंचायत समिती तर्फे तालुका स्तरावर साजरा करण्याचे आयोजन केले आहे



प्रतीवर्षी देखील केले जाईल कमी वेळात झाला असून यापुढे अधिक चागला करण्याचा प्रयत्न केला जाईल यावेळी नगरपंचायत हद्दीसह दिव्यांगाचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. दिव्यांग संघटना अध्यक्ष किशोर पितळे यांनी जागतिक दिव्यांगदिनाचेमहत्त्वसंकल्पना इतिहास विषद केला दिव्यागांच्या समस्या मांडल्या. पंचायत समिती ने जागतीक दिव्यांग दिन साजरा करून दिव्यांगाचे मनोबल जनजागृती व गुलाब पुष्प देऊन सन्मान केला त्याबद्दल धन्यवाद दिले. तालुका आरोग्य अधिकारी, बालकल्याण प्रकल्प विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग अधिकारी यांनी देखील माहिती दिली व जागतिक दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच आरोग्य तपासणी, रक्तदाब, रक्तगट, ब्लडप्रेशर तपासणी करण्यात आली. व अँम्लिको संस्थेकडून विद्यार्थ्यांअपंग सायकल, अंध व्यक्तींना सेन्सर स्टीक,व किट वाटप करण्यात आले यावेळी सचिव अमिष भौड, उपाध्यक्ष सहदेव पारधीखजिनदार प्रकाश मेकडे सल्लागार मोरेश्वर फुलारे व सदस्य, तालुक्यातील दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुधागड तालुक्यातील विज्ञान प्रदर्शनात हर्ष विजय जाधव प्रथम

**दै.रायगड नगरी । अमित गायकवाड**

**पाली/वाघोशी ।** विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी डढएच या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित ४३ वे सुधागड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन सन २०२५-२६ दि. २ व ३ डिसेंबर २०२५ रोजी पाली येथे अत्यंत उत्साहात पार पडले. या विज्ञान महोत्सवात तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी कल्पकता, नवोन्मेष, विज्ञानाची समज आणि प्रात्यक्षिक सादरीकरण यातून आपले कौशल्य सादर केले.



याच प्रदर्शनात माध्यमिक विद्यालय वाघोशी येथील विद्यार्थी हर्ष विजय जाधव याने सादर केलेल्या 'दैनंदिन जीवनातील विज्ञान' या विषयावर आधारित प्रात्यक्षिकाने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. वैज्ञानिक दृष्टिकोन, संकल्पनेची अचूक मांडणी आणि प्रभावी सादरीकरण याच्या जोरावर हर्षने सर्व स्पर्धकांमध्ये आघाडी घेत प्रथम क्रमांक मिळवला.

या यशाची दखल घेत प्रदर्शन आयोजकांकडून हर्षला औपचारिक प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रमाणपत्रावर प्रमुख मान्यवरांची स्वाक्षरी असलेले हे सन्मानपत्र विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच पालकांनी हर्षच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. विद्यालयाने सांगितले की, हर्षसारखे विद्यार्थी ग्रामीण भागातील विज्ञानविषयक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून पुढील पिढीला विज्ञानाकडे आकर्षित करण्याचे काम करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून विज्ञान उपक्रमांना विशेष प्रोत्साहन दिले जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या यशामुळे वाघोशी परिसरातही आनंदाचे वातावरण असून मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून हर्षवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेतही हर्ष उत्तम कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हर्ष विजय जाधवचे हे यश ग्रामीण भागातील विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# ह.भ.प. सिताबाई कुंरगळे यांचे निधन

**पनवेल ।**



नारपोली येथील धार्मिक व परोपकारी वृत्तीच्या ह.भ.प. श्रीमती सिताबाई जेठू कुंरगळे यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दिर, जावई, सुना, नातवंडे असा मोठा कुंरगळे परिवार असून नारपोली स्मशानभूमीत त्यांना सर्व क्षेत्रातील मंडळींनी श्रध्दांजली अर्पण केली. त्यांचे उत्तरकार्य १४ डिसेंबर रोजी राहत्या घरी होणार असून यादिवशी १० वा. ह.भ.प. प्रल्हाद महाराज वहाळकर यांचे कीर्तन होणार आहे.

# उरण फाटा सर्व्हिस रोड आणि कळंबोली स्टील मार्केट येथील १० तृतीयपंथीयांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण फाटा सर्व्हिस रोड आणि कळंबोली स्टील मार्केट येथील १० तृतीयपंथीयांवर गुन्हे शाखेने कारवाई केली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात तृतीयपंथीयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी कक्षाकडील अधिकारी व अंमलदार यांच्या दोन टिम तयार करून नवी मुंबई आयुक्त परिसरातील उरण फाटा सर्व्हिस रोड व कंळबोली स्टील मार्केट रोड येथे तोकडे कपडे परिधान करून रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना टाळया वाजवुन हातवारे, बिभत्स हावभाव व अश्लिल चाळे करत असताना मिळुन आल्या. त्यावरून उरण फाटा सर्व्हिस रोड येथुन ५ तृतीयपंथी तसेच कळंबोली स्टील मार्केट रोड येथुन ५ तृतीयपंथी ताब्यात घेवुन त्याच्या विरूध्द सीबीडी व कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल केले आहेत.

सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी पृथ्वीराज घोरपडे, सपोनि राजश्री शिंदे, पोउपनिरी सरिता गुडे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, मपोना अडकमोल, मपोना भोये, चालक पोहवा हांडे यांनी केली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# शुक्रवारपासून पनवेलमध्ये १२ व्या राज्यस्तरीय ‘अटल करंडक’ एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या १२ व्या स्पर्धेची महाअंतिम फेरी दिनांक ०५, ०६ आणि ०७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा 'अटल करंडक' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार तसेच ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते व निर्माता सुनिल बर्वे यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार असून राज्यभरातून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका या तीन दिवसांच्या महाअंतिम फेरीत सादर होणार आहेत.

या महाअंतिम फेरी सोहळ्याचे उदघाटन शुक्रवार दिनांक ०५ डिसेंबरला सकाळी ०९ वाजता पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध नाट्य निर्माता कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, राजू सोनी, तेजस कांडपिळे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज यांची उपस्थिती असणार आहे.

तर पारितोषिक वितरण समारंभ रविवार दिनांक ०७ डिसेंबर रोजी सायंकाळी ०४ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी गौरव रंगभूमीचा पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी व सुनील बर्वे, तसेच सन्माननीय उपस्थिती म्हणून माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे यांची तसेच भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचबरोबर या दिवशी प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत. तसेच बक्षिस वितरण सोहळ्याच्या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट त्याचबरोबर हास्य सम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहे. या महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

# म्हसळा तालुक्यात सर्वत्र दत्तजयंती उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सालाबाप्रमाणे याही वर्षी श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. त्यामध्ये प्रामुख्याने तोंडसुरे, खारगाव बुद्रुक, देवघरकोंड, निगडी, स्वयंभू दत्त मंदिर वारळ आणि तालुक्यातील इतर ठिकाणी साजरे होणारे उत्सव यांचा समावेश आहे.सालाबादप्रमाणे याही वर्षी ग्रामस्थ व महिला मंडळ तोंडसुरे स्थानिक आणि मुंबई यांच्या वतीने गोपाळ गोविंद भायदे यांच्या अध्यक्षतेखाली उत्सव संपन्न झाला. या निमित्ताने पहाटे ४ वाजता काकड आरती, ५ वाजता अभ्यंग स्नान आणि अभिषेक, सकाळी ७ वा. आरती, ११. ३० वा. महाआरती व तीर्थ प्रसाद, आणि दुपारी १ वाजलेपासून महाप्रसाद अश्या भरगच्छ कार्यक्रमानंतर दुपारी ३ वाजता श्री दत्त गुरूंची पालखी संपूर्ण गावभर काढण्यात आली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ४० (ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण ११ कामे समाविष्ठ असुन ऑफलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०५.१२.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक १२.१२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल /----
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-
क्र.आरओसी-२०२५-२६/क्र.५/सी ४३६५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे कोयनावेळे (जुने घोट), तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कोयनावेळे (जुने घोट), तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| | २२/२ | ०-५९-२०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण क्षेत्र ०-६१-२० | ९.९४ |

सदर वर्णन केलेल्या जमिनीवर गोविंद राघो पाटील व इतर १५ राहणार मु. घोट, ता. पनवेल, जि. रायगड वादी विरूध्द रामकृष्ण माधवराव भिसे व इतर ५, राहणार मु. घोट, ता. पनवेल, जि. रायगड प्रतिवादी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार मा. उपविभागीय अधिकारी पनवेल विभाग-१, यांच्या न्यायालयात ऑन ॲडमिशन टेनन्सी अपिल दि. ०५/०८/२०२४ रोजीच्या आदेशान्वये दावा वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण होवू नये म्हणून सुनावणीपुर्ण स्थगिती देण्यात आली आहे. तरी सदर वर वर्णन केलेली मिळकत कोणी अन्य त्रयस्थ व्यक्तींनी खरेदी अथवा विक्री तसेच सदर जमिनीसंबंधात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये ही जाहिर नोटीस देत आहोत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/१२/२०२५

**सही/-**
**(गोविंद राघो पाटील)**
**घोट, ता.पनवेल, जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक,
आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृह च्या समोर,
ता. पनवेल, जि. रायगड पिनः ४१०२०६
E mail: uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/मृत्यू/७३५३८०९/२०२५ दि.२१/११/२०२५

## नोटीस

विषय :- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.
संदर्भ :- अर्जदार श्री. नामदेव गोपाळ गवते,
यांचा दि. २७/१०/२०२५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. नामदेव गोपाळ गवते, रा. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांची बहिण कै. माई गोपाळ गवते यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २६/१२/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(जितेंद्र मा. इंगळे-पाटील)**
**अपर तहसीलदार पनवेल**

# पनवेल महानगरपालिका
## शहर अभियंता विभाग
## दरपत्रक

जा.क्र.पमपा/बांधकाम/ /प्र.क्र. /४६५०/२०२५ दिनांक : ०४/१२/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड मधील नवीन पनवेल सेक्टर-१अ येथील HDFC बँक व अग्निशमन केंद्र नवीन पनवेल लगत चौकाचे सुशोभिकरण करणे. | ०५/१२/२०२५ ते १२/१२/२०२५ (०७ दिवस) |
| २ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड मधील नवीन पनवेल सेक्टर-८ खांदा कॉलनी येथील आदई गाव फाटा, हॉटेल फिनिक्स समोर डेकोरेटीव्ह म्युरल बसविणे. | |
| ३ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह परिसरात डेकोरेटीव्ह म्युरल बसविणे. | |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.०५/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

# ऐतिहासिक तळगडावर सापडला गुप्त दरवाजा

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा ।** तळा शहरातील ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर शिवकालीन गुप्त दरवाजा सापडला असून हा गुप्त दरवाजा शोधण्याची यशस्वी कामगिरी दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांनी बजावली आहे.तळगडावर कित्येक वर्ष मातीत लुप्त झालेल्या गुप्त दरवाजा बद्दल प्रतिष्ठानच्या सदस्यांना माहिती मिळाली असता काही अभ्यासकांकडून गडाची माहिती घेण्यात आली. व नकाशाच्या सहाय्याने दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य तळा विभागातर्फे तळगडावर गुप्त दरवाजा शोध मोहीम राबविण्यात आली.प्रथमतः २३ नोव्हेंबर रोजी १५ ते २० सदस्य तर ३० नोव्हेंबर रोजी ४५ ते ५० सदस्यांसह दोन टप्प्यात ही शोध मोहीम राबविण्यात आली.अखेर या शोध मोहिमेला यश मिळाले व गेली कित्येक वर्षे लुप्त झालेला गुप्त दरवाजा सापडला.मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेला होता. दुर्गरत्न प्रतिष्ठानच्या सदस्यांनी फावडे,पिकाव,पारई,घमेल आदी साहित्यांसह आपल्या अथक परिश्रमाने हा चोर दरवाजा पूर्वीसारखा पूर्णपणे मोकळा केला.

तळगड हा रायगड जिल्ह्यातील रोहा शहरापासून १८ किमी अंतरावर असलेला एक डोंगरी किल्ला आहे, जो १००० फूट उंचीवर आहे. हा किल्ला शत्रूंवर लक्ष ठेवण्यासाठी आणि मावळ ते सागरी बंदरांपर्यंतच्या व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वाचा होता. तटबंदीने संरक्षित असलेला अरुंद वळणासारखा किल्ला.शत्रूंवर लक्ष ठेवण्यासाठी आणि व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वाचा. जंजिऱ्याच्या सिद्धींच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरला जात असे.या किल्ल्यावरून घोसाळगड किल्लाही दिसतो. गडावर गुप्त दरवाजा सापडला आहे. गुप्त दरवाजाचा उपयोग मुख्यत्वे शत्रूपासून सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी किंवा गडावर रसद पोहोचवण्यासाठी केला जात असे.लढाईच्या काळात जेव्हा शत्रूचा प्रतिकार करणे शक्य नसे, तेव्हा सैनिकांना सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी हा मार्ग दिला जात असे.युद्धाच्या वेळी गडावर अन्न, पाणी आणि शस्त्रे यांसारख्या आवश्यक वस्तू पोहोचवण्यासाठी या दरवाजांचा वापर केला जात असे. हा दरवाजा मुख्य प्रवेशद्वारापेक्षा कमी ओळखला जात असल्याने, गडावर गुप्तपणे प्रवेश करण्यासाठी किंवा बाहेर पडण्यासाठी याचा वापर होत असे.या गुप्त दरवाजाचा शोध घेण्यासाठी अथक परिश्रम घेतलेल्या दुर्गरत्न प्रतिष्ठानच्या सदस्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून यामुळे तालुक्यातील नागरिकांसह तळगडावर येणाऱ्या पर्यटकांनाही हा शिवकालीन गुप्त दरवाजा पाहता येणार आहे.



## जाहीर नोटीस

सदर नोटीस द्वारे तमाम जनतेस आमचे अशिल श्री राजीव रंजन सिंग भारतीय रहिवासी, धंदा-विकासक, ऑफीस पत्ता:- ३०६,फाऊंडेशन टॉवर,से-११. सीबीडी बेलापुर नवी मुंबई हे खालिल वर्णानाची मिळकत मयत श्री कमलाकर काळु भोपी यांचे वारस अ) जगदीश कमलाकर भोपी ब) रविकांत कमलाकर भोपी क) श्रीकांत कमलाकर भोपी ड) कु मंगेश कमलाकर भोपी (२)श्रीमती रेवती प्रल्हाद भोपी सर्व जण राहणार- वडघर, तालुका-पनवेल,जिल्हा रायगड ,यांचे कडुन कायमस्वरुपी विकत घेत आहेत. आणी त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरीत करुन घेत आहेत.सदर मिळकत ही श्री. कमलाकर काळु भोपी यांच्या मालकीची व वहिवाटीची असलेल्या संपादित जमिनीपोटी सिडको महामंडळाकडुन मिळाली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे : पुष्पक, ता.पनवेल, जि.रायगड | ५१८ | २५ ए | ११० चौ.मी. क्षेत्र चौरस |

तरी सदर भुखंडा बाबत, कोणाचाही कोणत्याही भागावर, गहाण, दान, बक्षीस,फरोक्त,तारण,भाडेकरू हक्क, साठे करार, मुखत्यारपत्र, सामंजस्य करार किंवा यासारखे कोणतेही दावे, मालकी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे योग्य हितसंबंध असल्यास, उक्त व्यक्ती किंवा संबंधित ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे.वरील विहित कालावधीत कोणाचाही आक्षेप किंवा तक्रार नसल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क ,हितसंबध नाही असे समजुन आमचे अशिल सदर भुखंडाचा व्यवहार पुर्ण कर्ती व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकानी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.श्रीमती.रेखा होवाळे**
**ऑफिस नं. १३, प्रभात सेंटर**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**
**मोबाईल ८३६९०१७३६३**

## PUBLIC NOTICE

notice is hereby given that the documents Bearing original, allotment letter, executed MRS. **MARY ANGEL JOHN** ( THE APARTMENT OWNER) has been misplaced and not traceable yet.

If found kindly inform to **ADV. MANJIT KAUR SANDHU at VASTU SHANTI TOWER A WING 303 KALAMBOLI 410218**

**Description of lost/ misplaced original documents**

All the piece and parcel OF land situated at **ROOM NO. 07, PLOT NO. B-3, NEW PANCHAVATI Co.op HOUSING SOCIETY Ltd, SECTOR-15, AT KALAMBOLI, (NAVI MUMBAI), TAL : PANVEL, DIST : RAIGAD**

Any person who finds the said title documents should intimate to the undersigned & if any person, bank, financial institution having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage ,lease ,lien , license ,gift, possession or encumbrance howsoever or otherwise or having above documents is hereby called upon to intimate to the undersigned within 15 days from the date of publication of this notice of his such claim &the claims, if any of such person shall be treated as waived & not binding on our clients.

Date: 04/12/2025

SD/-
**ADV. MANJIT KAUR SANDHU**
**7738900770**

## जाहीर नोटीस

सर्वास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, निम्ननिर्दीष्ट मालमत्ता जमिनी मालकांनी त्यांचे मालकीवहिवाटची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला असुन मिळकतीचे सर्व हक्क अधिकारसुध्दा मिळकत कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलांन जवळ बोलणी चालु आहे तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटिस प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सदर मिळकती संदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षीस, लीन,, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणाचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे अन्यथा सदर नोटिस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणिवपुर्वक सोडुन दिले आहेत-तसे गृहित धरून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिध्द करणेस येत आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन मौजे वाली,**
**ता रोहा, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| अनु. क्रं. | सर्व्हे क्रं. गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ११६ | १-२०-००<br>पैकी<br>०-८०-०० | सारिका दिलीप दराडे<br>आभास काशिनाथ देसाई (HUF)<br>तर्फे अखत्यारी<br>श्री किरण अनंत पाटिल |

माणगांव
दि.०४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.संस्कृती एस. शिंदे**
**रा.तळाशेत, ता.माणगांव, जि.रायगड**
**मो.नं.८४५९८१००३३**
**(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)**

मा.गणवीर मॅडम कोर्ट
ॲड. सचिन बी. कोंडीलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३१०/२०२५
नि.नं.८/ड
ने. ता. १५/१२/२०२५

कै. रविंद्र रामदास राणे (मयत) वारस
कै. सुरेखा रविंद्र राणे (मयत) वारस
१) जयेश रविंद्र राणे
वय. ३६ वर्षे, धंदा. नोकरी
१ ते ३ रा.२०५, गुरुपुष्प बिल्डीग को.ऑ.हौ.सो.
गॅल्डन हारवेस्ट हॉटेल साई नगर रोड,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
२) योगिणी नितीन झांबरे
वय. ४२ वर्षे, धंदा. नोकरी
राहणार. १०२, रंगश्री सोसायटी,
वीर सावरकर, नौपाडा, ठाणे. जि.ठाणे. ४००६०२ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळवितो की, कै. रविंद्र रामदास राणे यांचे निधन. मु.एम्स हॉस्पीटल पुणे येथे तारीख. १०/०६/२०१७ रोजी झाले आहे. तसेच कै. सुरेखा रविंद्र राणे हया दि. २०/०७/२०२५ रोजी लाईफ लाईन हॉस्पीटल पनवेल येथे मयत झालेल्या आहेत. कै. रविंद्र राणे याच्या आई कै. लक्ष्मीबाई रामदास राणे हया खुप वर्षापुर्वी मयत झाल्या असुन त्यांना त्यांचा मृत्युदाखला आज रोजी अर्जदार याचे कडे उपलब्ध नाही. अर्जदार क्रं. १ व २ हेच कै. रविंद्र रामदास राणे व कै. सुरेखा रविंद्र राणे याचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावा म्हणून मे. कोर्टात अर्ज केलेला आहे कै. रविंद्र रामदास राणे व कै. सुरेखा रविंद्र राणे यांचे नावे असलेल्या सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन**
**सदनिका मिळकतीचे वर्णन**
**मौजे. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

| इमारतीचे नाव सदनिका नं. | प्लॉट नं. | सर्व्हे नं. | चौ.फुट |
|---|---|---|---|
| सदनिका नं.२०५, दुसरा मजला, गुरुपुष्प को.ऑप. हौ.सो.लि. | १० | ७४६/१ए, ७४६/१ब ७४६/२ब+१क ७४६/२ ए, व ७४६/२ब | ६६१ चौ.फुट व ६० चौ.फुट टेरेस |

ही मिळकत कै. सुरेखा रविंद्र राणे व कै. रविंद्र रामदास राणे यांचे नावाने आहे.

**ब) मौजे. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

| सदनिका क्रं. | बिल्डींगचे नांव | फायनल प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १०४ पहिला मजला | शितल को.ऑ. हौ.सोसायटी | १२४/५ | ५२६ व टेरेस |

ही मिळकत कै. रविंद्र रामदास राणे यांचे नावे आहे.

क) मौजे. गणेगाव खालसा, तालुका. शिरूर, जि.पुणे, येथील सर्व्हे क. ३५५ हिस्सा क्र. २, क्षेत्र ०-३९-०, आकार. ०.२१ रू.पै. या मिळकती मध्ये कै. सुरेखा रविंद्र राणे यांच्या नावे आहे.

ड) मौजे. मोहपे, तालुका. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. १ हिस्सा क्र. ३, क्षेत्र ०-९-९०, आकार. १.०६ रू.पै. ही मिळकत कै. सुरेखा रविंद्र राणे याचे नावे आहे.

इ) मौजे. डोंगर कठोरा, तालुका. यावल, जि. जळगाव, येथील गट क्र. १०६६, हिस्सा क्र. १, क्षेत्र २. १६, हे. आर आकार. ३.८ रू.पै. ही मिळकत कै. सुरेखा रविंद्र राणे याच्या नावे आहे.

ई) मौजे. धाकटे वेणगाव, तालुका. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ५६ हिस्सा क्र. २, क्षेत्र ०-२९-८० हे.आर. पॉ आकार. ७.१९ रू.पै. ही मिळकत कै. सुरेखा रविंद्र राणे याचे नावे आहे.

फ) मौजे. धाकटे वेणगाव, तालुका. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ५५ हिस्सा क्र. १, क्षेत्र ०-८-७० हे.आर.पॉ आकार. ०.९ रू.पै. ही मिळकत के. सुरेखा रविंद्र राणे हीच्या नावे आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर अर्जदार कै. रविंद्र रामदास राणे व कै. सुरेखा रविंद्र राणे यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ३/१२/ २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त...

# नवी मुंबई  खारघर येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रशासनाचे सहकार्य : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २१ डिसेंबर २०२५ रोजी खारघर, नवी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी जिल्ह्यातील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजातील प्रतिनिधींनी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असणार आहे. तरी या कार्यक्रमाची सुरुवात आरम्भता की 'अरदास रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आली.




नवी मुंबई,  खारघर येथील कॉर्पोरेट पार्क येथे  २१ डिसेंबर २०२५ रोजी  शहिदी समागम शताब्दी  या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्या हस्ते आरम्भता की अरदास करुन  करण्यात आली. यावेळी क्षेत्रिय आयोजन समिती, नवी मुंबईचे अध्यक्ष अमरपाल सिंघ रंधावा, सुप्रीम कॉन्सील, नवी मुंबई गुरुद्वाराचे अध्यक्ष श्री. जसपाल सिंग सिद्धू, खारघर गुरुद्वाराचे अध्यक्ष परमजित सिंग  बल,  महाराष्ट्र राज्य सिख समन्वय समितीचे  श्री. चरणदीप सिंग (हॅप्पी सिंघ), उपस्थित होते. सिंग समाजाचे अध्यक्ष लड्‌ राम नागवाणी, निमंत्रक तथा राज्यस्तरीय समिती तथा कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य पंजाब अकॅडमीचे मिंलकित सिंग बल, उपजिल्हाधिकारी रायगड रविंद्र राठोड यांची उपस्थिती होती.

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर'यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त २१ डिसेंबर २०२५ रोजी खारघर, नवी मुंबई येथे हा कार्यक्रम होत असून आपण भाग्यवान आहोत की, या कार्यक्रमाचे नियोजनाची संधी आपल्याला मिळाली आहे.

या कार्यक्रमाला शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी,वाल्मीकी, भगत नामदेव परंपरा-समाज या समाजातील प्रतिनिधींनी  यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असणार आहे. प्रशासनाच्या समन्वयाने या शहिदी कार्यक्रम उत्साहात होणार असल्याची ग्वाही देत जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, या शहिदी कार्यक्रमामुळे श्री गुरु तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतिक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रध्देचा गौरव करण्यात येणार आहे. या समागम कार्यक्रमामुळे सदर समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरु बंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला बलकित सिंग म्हणाले की, युवा पिढीपर्यंत श्री गुरु तेग बहादूर यांचे कार्य पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर, नवी मुंबई येथील खारघर येथे हा कार्यक्रम होणार आहे.  तरी आपल्या सर्वांच्या समन्वयाने कार्यक्रम यशस्वी करुया, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

नेटवर्क मिळत नसल्याने शासनाचे ऑनलाईन धोरण कुचकामी

# शेतकऱ्यांना ई-पीकपाणी मुदत वाढवून द्यावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसणार

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** यंदा पडलेल्या परतीच्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भातपीकाचे अतोनात नुकसान झाले असून त्यातच शासनाचे ई-पीकपाणी नोंद करण्यात नेटवर्क मिळत नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना ई-पीकपाणी नोंद करण्यात मुदत वाढवून द्यावी किंवा शासन धोरण शिथिल करण्यात यावे. अशी मागणी मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी तर्फे अध्यक्ष ॲड.विनायक शेडगे यांनी आपल्या सहकारी शेतकरी बांधवांसमवेत तहसीलदार आदेश डफळ यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली असून अन्यथा वेळप्रसंगी याविरोधात तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसणार.असा इशारा देण्यात आला आहे.




तालुक्यातील शेतकरी परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीतून सावरलेला नसताना त्यावर आता पुन्हा एकदा अतिशय मोठे संकट आले आहे .पावसाच्या तावडीतून वाचलेले भाताचे पीक शेतकऱ्यांनी अथक परीश्रम करून जमा केले, (कापणी, बांधणी, मळणी करून) परंतू ते विक्रीसाठी तालुक्यातील कृषी सेवा भात खरेदी विक्री केंद्रावर नेले असता  शासनाच्या ई-पीकपाणी धोरणाची- नोंदणी न केल्याने घेतले जात नाही आणि नेटवर्क मिळत नसल्याने शासनाचे ऑनलाईन धोरण कुचकामी ठरत आहे.

येथील शेतकरी हा अल्प भुधारक असून शेती व्यतिरिक्त दुसरा मुख्य व्यवसाय नाही, वर्षभर मेहनत करून पावसाच्या आसमानी संकटातून वाचलेल्या भाताची मळणी करून विक्रीसाठी घेवून जाणे आता त्याला जमणार नाही,भात विक्रीतून मिळणाऱ्या पैशातुन मुला बाळांचे शिक्षण, आरोग्य व घरात खाद्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी या शेतीवरच आहेत परंतू आता त्याच्यावर हे शासकिय संकट आले आहे, त्याकरिता शासनाने शेतकऱ्यांच्या ई -पीकपाणी नोंदणी करण्यासाठी दहा दिवसांची मुदत वाढवून देण्यात यावी.असे मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून अन्यथा वेळप्रसंगी याविरोधात तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसणार.असा इशारा देण्यात आला आहे.सदर निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री, महसूलमंत्री, जिल्हाधिकारी -रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

यावेळी मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीचे तालुका अध्यक्ष ड.विनायक शेडगे, चंद्रकांत कमाने, नितेश पाटील,नितेश भणगे,नरेश तळेकर, बाळकृष्ण वाडकर, नितेश कार्लेकर, शैलेश पाटील,सागर मेस्त्री, नितेश बाळकृष्ण नाक्ती, शशिकांत मोरे, नारायण मोरे, मिथुन चोरडेकर, नितेश मनोहर नाक्ती, अनिल भेर्ले शेतकरी बांधव उपस्थित होते.

# उरणात वणव्याची आग आणि निसर्गसंपदाची राख

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात सुरु असलेल्या वणव्यांमुळे निसर्गसंपदा आणि पर्यावरण साखळी धोक्यात आली आहे. माळरान, डोंगररांगा आणि पर्यटन क्षेत्रांचे निसर्गसौंदर्य ही खराब होत आहे. औषधी वनस्पती, जंगली प्राणी, पक्षी, कीटकांचा मृत्यू होतो. याशिवाय वणव्यांमुळे वित्तहानी आणि अनमोल जीवितहानी ही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वणवे लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र शासनाचे सर्व विभाग यासंदर्भात तसेच जनजागृती करण्यासाठी कमी पडत असल्याची बाब सध्या समोर येत आहे.

उरण हा मुंबई व नवीमुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेला निसर्ग सौंदर्याने नटलेला तालुका आहे.मात्र वाढते औद्योगिकीकरण आणि नागरिकरण यामुळे या ठिकाणच्या निसर्ग सौंदर्याचा हळूहळू ऱ्हास होऊ लागला आहे. तसेच काही नागरिक हे स्वतः च्या स्वार्थापोटी माळरान, डोंगररांगाना आगी लावून पळ काढत आहेत. त्यामुळे माळरान,डोंगररांगांचे आणि पर्यटन क्षेत्रांचे निसर्गसौंदर्य ही अशा आगीच्या भक्ष्यस्थानी खराब होत आहे.औषधी वनस्पती,जंगली प्राणी, पक्षी, कीटकांचा  मृत्यू होत आहे. याशिवाय वणव्यांमुळे वित्तहानी आणि अनमोल जीवितहानी ही मोठ्या प्रमाणात होत आहे. तरी वणवे लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र शासनाचे सर्व विभाग यासंदर्भात तसेच जनजागृती करण्यासाठी कमी पडत असल्याची बाब सध्या उरण तालुक्यातील डोंगररांगाना लागलेल्या आगीच्या घटनेतून समोर येत आहे.



# माथेरानमध्ये चोख पोलिस बंदोबस्तात मतदान यंत्रे अधीक्षक कार्यालयात सुरक्षित

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** माथेरान नगरपालिका निवडणूक संपल्यानंतर तीन तारखेला लागणारा निकाल २१ तारखेपर्यंत पुढे ढकलल्याने येथील मतदान यंत्रे माथेरानच्या अध्यक्ष कार्यालयामध्ये  सील करण्यात आली असून या परिसरामध्ये पोलिसांकडून कडक बंदोबस्त करण्यात आला आहे.



राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. काही नगरपरिषदांबाबत  न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार होती. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जा-हीर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान आता नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरपर्यंत पुढे गेल्यामुळे प्रशासनाचा ताण तर वाढलाच आहे. शिवाय निवडणुकीसाठीचा खर्चही वाढणार आहे.

माथेरान मध्ये अधीक्षक कार्यालयामध्ये कर्जत तालुक्याचे डी वाय एस पी श्री राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरानचे पोलीस एपीआय श्री अनिल सोनोने यांच्या नेतृत्वाखाली एक एस आर पी चे तुकडी स्थानिक पोलिसांबरोबर २४ तास या ठिकाणी पहारा देत असून राजकीय नेत्यांना सुद्धा या ठिकाणी एक प्रतिनिधी लक्ष ठेवण्यासाठी अनुमती देण्यात आल्यामुळे राजकीय पक्षांचे प्रतिनिधी या ठिकाणी येऊन जाऊन आहे संपूर्ण परिसर ह सीसीटीव्ही च्या नजरेखाली असल्याने कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता  निवडणूक अधिकारी तसेच माथेरानचे अधीक्षक श्री सुरेंद्र सिंग ठाकूर स्वतः या प्रक्रियेवरती लक्ष ठेवून आहेत.

या परिसरातच माथेरानच्या नगरपालिकाचे मुख्य कार्यालय आहे त्याचप्रमाणे माथेरान सरकारी रुग्णालय असल्याने येथे नागरिकांचा वावर असल्यामुळे या ठिकाणी अधिक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

# एकोप्यातूनच आदर्श गावाची उभारणी होते : सुशांत जाबरे

**दै.रायगड नगरी । निलेश लोखंडे**

**महाड ।** गावाच्या विकासासाठी केवळ पैसाच महत्वाचा नसून भेदभाव सोडून एकजुटीने, स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन प्रयत्न केले, तर आदर्श गाव निर्माण होऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण चिंभावे हळदवणेवाडी या गावात प्रकर्षाने जाणवले असे विभग फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुशांत जाबरे यांनी प्रतिपादन केले.

चिंभावे हळदवणेवाडी गावाची वार्षिक श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे औचित्य साधून छोटेखाणी सत्कार सोहळयाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पं.समितीचे माजी सभापती सदानंद मांडवकर, चिंभावे सरपंच विक्रम मालप, सदस्य नितीन कदम, कुणबी समाजोन्नती मंडळ महाड-पोलादपूर शाखेचे सहसचिव समीर रेवाळे, कृषी उत्पन्न समितीचे चेअरमन संदेश गोठल, सुनील जाधव, सेवानिवृत्त अन्नदाते रघुनाथ पां.भागवत, डॉ. विनायक डवरे, डॉ. सुभाष माने, ज्ञानेश्वर गजमल, कुणबी समाज ओळेगट अध्यक्ष प्रकाश देवळे, माजी अध्यक्ष अनंत शिंदे, राजेंद्र भुवड, जुई माजी सरपंच जावेद दुस्ते यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

ग्रामस्थांची एकजुट म्हणजे गावातील लोक एकत्र येऊन सामूहिक प्रयत्नांनी गावाच्या विकासासाठी किंवा समस्या सोडवण्यासाठी काम करतात. हे सहभागातून, वर्गणी जमा करून आणि श्रमदान करून शक्य होते, ज्यायोगे गावात विविध सोयी-सुविधा उभ्या केल्या जातात आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन किंवा इतर सामाजिक कार्यांमध्ये यश मिळते. गावासाठी जे-जे माझ्याकडून सहकार्य लागेल ते मी करायला कटिबद्ध असल्याचे जाबडे यांनी सांगितले. मांडवकर यांनी गावाच्या एकीचे विशेष कौतुक केले. पत्रकार भागवत यांच्या माध्यमातून खाडीपट्टयाचा बुलंद आवाज म्हणून आम्ही गेली अनेक वर्षे त्यांची पत्रकारिता पाहत आहोत असेही ते म्हणाले. यावेळी पत्रकार रघुनाथ भागवत यांना नुकताच जाहीर झालेला कलगी-तुरा समाज उन्नती मंडळाचा आदर्श पत्रकार पुरस्कारामुळे मान्यवरांच्या हस्ते गावाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणपत मालप यांनी सुंदरप्रकारे केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुंबई मंडळाचे संदीप मालप, अजित देवळे, योगेश मालप, मुंबई पोलीस प्रमोद ठोंबरे, माजी सैनिक जितेंद्र शिकवण, रवींद्र भारसिंग, प्रकाश देवळे, सतीश भारसिंग, शैलेश आंबेकर, अमोल ठोंबरे, दत्ताराम आंबेकर आदी तसेच ग्रामस्थ मंडळाचे विजय साळी, सिताराम भारसिंग, दगडू ठोंबरे, नारायण चव्हाण, विक्रांत घाणेकर आणि सर्व ग्रामस्थ, महिला मंडळाने मेहनत घेतली. यावेळी चिंभावे सुतारकोंड येथील हरिपाठ, सुस्वर भजनाने सर्वत्र मंगलमय वातावरण पसरले होते.



# पिंपळवाडी येथील घरात चोरीचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल आणि आजूबाजूच्या परिसरात चोरीचे प्रमाण वाढू लागले आहे. धोदाणी परिसरातील पिंपळवाडी येथील घरात चोरीचा प्रयत्न करण्यात आला. सुदैवाने चोरांना चोरी करता आली नाही आणि ते रिकाम्या हाताने परत गेले.

पनवेल तालुक्यातील धोदाणी जवळील पिंपळवाडी येथील घरामध्ये मिनू पटेल हे २७ नोव्हेंबर रोजी झोपले होते. रात्री साडे अकराच्या सुमारास दोघेजण गेटमधून उडी मारून चोर आत मध्ये आले आणि ते घराच्या आतमध्ये शीरायला पाहत होते. चोरांनी या ठिकाणची वाय-फायची केबल देखील तोडली.

खिडक्या आणि दरवाजे बंद असल्याने त्यांना पटेल यांच्या घरामध्ये जाता आले नाही. त्यांनी आत मध्ये जाण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले आणि त्यांना चोरी करता आली नाही. तालुक्यातील अनेक ठिकाणी गुरे चोरीचा देखील प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच दुकान, ज्वेलर्स या ठिकाणी देखील घरफोडी झाल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी केली जात आहे.

# रायगड जिल्हा परिषद शाळा आडघर येथे 'मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान' उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड जिल्हा परिषद शाळा, आडघर येथे राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शाळेच्या विकासकामांना गती देणे आणि ग्रामविकासास हातभार लावणे या उद्दिष्टांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत सदस्य श्रावणी संतोष दसवते तसेच तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य पूनम राहुल दसवते, ग्रामपंचायत अधिकारी श्रीम. रूपाली देवरे तसेच कर्मचारी वर्ग आणि अंगणवाडी सेविका मदतनीस व या शाळेचे मुख्याध्यापक  संतोष मोहिते सर व सर्व महिला मंडळ ग्राम आडघर यांच्या सहकार्यातून संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यामध्ये अंगणवाडी, शाळा इत्यादी परिसर स्वच्छ करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद प्रतिसाद मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभियानांतर्गत स्वच्छता उपक्रम, वृक्षारोपण, पोषण-जागृती, डिजिटल साक्षरता, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण यांसारख्या अनेक जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळा स्तरावर घेतलेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्यभावना, सामाजिक सहभाग आणि ग्रामविकासाची समज वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले. ग्रामपंचायत आडघर यांनी अभियानाला पूर्ण सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि सहभागींना गौरविण्यात आले. संपूर्ण उपक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल शाळा आणि ग्रामपंचायत यांच्या कार्याचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

